"जय सहकार"

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित
अंबरनाथ (पूर्व) जि. ठाणे.

नोंदणी क्रमांक :- टीएनए. / युएलआर / आरएसआर / (सी आर) / ३७४ / ८९-९०

—: कार्यालय :—

१९९४, श्री महालक्ष्मी मंदीराशेजारी, श्री महालक्ष्मी नगर,
अंबरनाथ (पूर्व) जि. ठाणे पिन ४२१५०१.

"शुभ चिंतावे शुभ इच्छावे वचनी शुभ बोलावे
शुभ कर्माच्या सामर्थ्याने करावे जीवनाचे सोने"

"सहकारात ऐपतीपेक्षा पतिला महत्व आहे" स्थापना : २८ ऑगष्ट १९८९

सभासद संख्या	६८४
भाग भांडवल	४,१८,४७०
अधिकृत भाग भांडवल	५,००,०००
बचत ठेवी	४,२३,५००
कर्ज वाटप	११,६९,०००
खेळते भांडवल	१०,५०,९५०
वार्षिक उलाढाल	१३,९९,७७१

— तिसरा वार्षिक अहवाल —

सन १९९१–९२

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ जि. ठाणे.

- संचालक मंडळ -

श्री. जयवंतराव बंडू फाटकर (विशेष कार्यकारी दंडाधिकारी)	अध्यक्ष
,, अनंतराव नारायण आंबरे (बी. ए.)	उपाध्यक्ष
,, हणमंतराव सदाशिव घनवट	चिटणीस
,, भिमराव यशवंतराव सुर्यवंशी बी. कॉम्.	खजीनदार
,, सुभाष शामराव भावसार	संचालक
,, अविनाश नारायण खानविलकर	,,
,, अशोक तुकाराम चोधरी	,,
,, भालचंद्र यशवंराव माने	,,
,, प्रकाश शंकर पाटील	,,
सौ. नलिनी कृष्णाजी यशवंतराव	,,
श्री. संजय जगन्नाथ दरेकर	,,
,, भगवान अर्जुन उतेकर	,,
हरिश्चंद्र यशवंत येरुणकर	,,

- अंतर्गत हिशोब तपासनीस -

श्री. शंकरराव केशवराव दरेकर ★ श्री. कृष्णाजी रामचद्र यशवंतराव बी.कॉम्.

हंगामी / अस्थायी कर्मचारी वर्ग

सुरेश मरळे   लाला घनवट   नितीन शं दरेकर   नाथा लोटके

श्री महालक्ष्मी नागरी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ (पूर्व) जि. ठाणे.

कोकणचे खंबीर नेतृत्व

सिडको अध्यक्ष

आदरणीय स्फूर्तीस्थान

श्री. दादासाहेब नलवडे

मा. श्री. नकुलजी पाटील

[redacted] अध्यक्ष, [redacted]

श्री. जयवंत काटकार
(झेड् पी सदस्य-कोल्हापूर)

उपाध्यक्ष

श्री अनंत ना आंबरे
बी. ए.

चिटणीस

श्री. हणमंत स घनवट

खजिनदार



श्री भिमराव य. सुर्यवंशी
बी.कॉम्

– संचालक मंडळ –

श्री सुभाष शा. भावसार

श्री. अविनाश ना. खानविलकर

श्री. अशोक तु. चौधरी

श्री भालचंद्र य. माने



श्री. प्रकाश शं पाटील

सौ. नलिनी यशवंतराव

श्री. संजय जगन्नाथ दरेकर



श्री. भगवान अर्जून उतेकर

श्री. हरिश्चंद्र य. येरुणकर

श्री महालक्ष्मी नागरी सह. पतपेढी मर्यादित अंबरनाथ पूर्व
अंतर्गत हिशोब तपासनीस

श्री शंकरराव के. दरेकर

श्री. कृष्णाजी रा यशवंतराव B. Com.

सन १९९२–९३ चा उत्पन्न व खर्चाचा अर्थ संकल्प (ता. १-७-९२ ते ३१-३-९३ पर्यंत)

जमा तपशील	सन १९९१-९२ चे उत्पन्न	सन १९९२-९३ चे अंदाज उत्पन्न	खर्च तपशिल	सन १९९१-९२ प्रत्यक्ष खर्च	सन १९९२-९३ चे अंदाजे खर्च
	रु. पै.	रु. पै.		रु. पै.	रु. पै.
सभासद कर्जावरील व्याज	१६६७१५-००	१३५०००-००	छपाई लेखन सामुग्री	४३०६-२५	५०००-००
			किरकोळ खर्च	३७८-००	५००-००
प्रवेश फी	९७-००	१००-००	प्रवास खर्च	५९-००	५००-००
			टपाल खर्च		१००-००
बँक लाभांश	५-००	५-००	पाहुनचार खर्च		१०००-००
			सभा खर्च	२४३७-००	३०००-००
बँक व्याज	९-००	१०-००	संचालक सभाभत्ता	८७०-००	१५६०-००
			ऑडीट फी	१८२०-००	२०००-००
			शिक्षण निधी	१०००-००	१०००-००
			मदतनिस व सचिव मानधन	२६२५-००	५४००-००
			अंर्तगत हिशोब तपासनी फी	१२०२-००	२०००-००
			जाहीरात खर्च	६७५-००	७००-००
			ठेवीवरील व्याज	२४९५०-००	२००००-००
			ऑफ स भाडे	१२००-००	२०००-००
			अस्थाई कर्मचारी व्यतन	२१६००-००	१८०००-००
			भाग परत	२२३०-००	२५००-००
	१६६८२६-००	१३५११५-००		६४३५२-२५	८५९६०-००

" जय सहकार "

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ जि. ठाणे.

सन १९९१-९२ हिशोब तपासणी वर्ग " अ "

जाहीर नोटीस

(फक्त सभासदांकरीता) दिनांक १४-१०-९२

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येते की, संस्थेची **वार्षिक सर्वसाधारण सभा** रविवार दिनांक १-११-९२ रोजी दुपारी २ वाजतां श्री. महालक्ष्मी मंदिर सभागृह अंबरनाथ (पूर्व) येथे आयोजित केली आहे. तरी सर्वांनी उपस्थित रहावे ही विनंती.

- सभेपुढील कामे -

१) मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे

२) सन १९९१-९२ चा अहवाल, ताळेबंद, नफातोटा पत्रक मंजूरी देणे.

३) सन १९९१-९२ च्या नफा विभागणीस मंजूरी देणे.

४) सन १९९२-९३ सालाकरितां अंतर्गत हिशोब तपासणीसांची निवड करणे आणि त्यांचे मानधन ठरवणे

५) पोटनियम दुरुस्तीबाबत विचार करणे.

६) सन ९१-९२ चा वैधानिक हिशोब तपासणीसांचे अहवाल वाचन

७) हंगामी कर्मचाऱ्यांचे वेतना बाबत.

८) कायदेशीर सल्लागार नेमणेबात.

९) ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर मा अध्यक्षांचे परवानगीने चर्चा करणे.

दिनांक १४-१०-९२

श्री. हणमंत सदाशिव घनवट
चिटणीस

टिप :- १) सभासदांनी आपल्या सुचना अगर प्रश्न संस्थेच्या कार्यालयात दि. २८-१०-९२ पर्यंत लेखी पाठवाव्यात.

२) सर्व सभासदांनी आपला अहवाल बरोबर आणावा

३) गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास, अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी त्याच विषयांवर सभेच्या कामकाजास सुरुवात होईल. त्यास गणपूर्तीचे बंधन रहाणार नाही.

" विना सहकार नही उद्धार "

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित
अंबरनाथ (पूर्व) जि. ठाणे.

- तिसरा वार्षिक अहवाल -

सन १९९१-९२

सन्माननिय सभासद बंधूभगिनींनो,

सप्रेम नमस्कार वि वि.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने संस्थेचा ३० जून १९९२ अखेरचा वार्षिक अहवाल, संस्थेची सांपत्तीक स्थिती दर्शविणारे ताळेबंद, आणि नफातोटा पत्रके आपल्या समोर ठेवतांना मला अत्यंत आनंद होत आहे. संस्थेनें चालू सहकार वर्षात केलेली नेत्रदिपक प्रगती, व जनमाणसांत मिळविलेले मानाचे स्थान याची सविस्तर माहिती देणे मी माझे आद्य कर्तव्य समजतो. त्याचप्रमाणें आपण केलेल्या सहकार्याबद्दल मी आपले स्वागत करतो.

सभासद, ठेवीदार, खातेदार, मार्गदर्शक त्याचप्रमाणें हितचिंतक या सर्वांच्या आशिर्वादाने व निर्भेळ प्रेमाने आपण सर्वजण समाधानाच्या शिखरावर पोहोचलो आहोत याचा मला सार्थ अभिमान वाटतो. नागरिकांमध्ये संस्थेचे सभासद होणे विषयी वाढलेली उत्सुकता आणि लागलेली चढाओढ पहाता ही संस्थेच्या संचालक मंडळाने केलेल्या प्रामाणिक, अथक परिश्रमाची पोचपावतीच आहे, असे समजतो.

संचालक मंडळाने परिश्रम पूर्वक केलेली सर्वांगीण प्रगती खालील तक्त्यावरुन लक्षात येईल.

अ नं.	तपशील	१९८९-९०	१९९०-९१	१९९१-९२
		रु. पै.	रु. पै.	रु. पै.
१)	सभासद	४६०	५९५	६८४
२)	भाग भांडवल	८७,३७०	२,३६,९३०	४,१८,४७०
३)	ठेवी	१,७५,५००	३,९०,५००	४,२३,५००
४)	कर्ज	२,९६,५००	८,७५,३००	११,६९,०००
५)	खेळते भांडवल	२,६९,८३९-५०	७,०५,३७४-५०	१०,५०,९५०-२५
६)	नफा	५,२७१-५०	२१,१७८-००	७०,८०४-२५

ठेवी :- ठेवी हा संस्थेच्या प्रगतीचा पाया आहे तो मजबूत ठेवण्यासाठी संस्थेचे संचालक मंडळ डोळ्यात तेल घालून परिश्रम घेत असते. अहवाल सालात संस्थेकडे एकूण रुपये ४,२३,५०० /- ठेवीच्या रुपात जमा आहेत.

नफा – अहवाल साली संस्थेस एकूण नफा रुपये ७०,८०४-२१ एवढा झाला आहे नफा विनियोग तक्ता सोबत जोडला आहे. त्यास आपण मंजुरी द्याल अशी अपेक्षा आहे.

कर्ज :- सभासदांची अडचण लक्षांत घेऊन संचालक मंडळाने सभासदांना तत्परतेने सुलभ हप्त्याने अणि विना-विलंब कर्ज सहाय्य देण्याचे विशिष्ठ धोरण अवलंबिले आहे सभासदांच्या गरजा भागवून त्यांच्या कुटुंबियांचे जीवन सुखी, समृद्ध व संपन्न व्हावे ही सदिच्छा ठेवून अहवाल साली संस्थेने एकूण रुपये ११,६९,०००/– कर्ज वाटप केले. आहे.

सभा :- अहवालसाली एकूण १२ सभा झाल्या सभासदांचे व संस्थेचे हित लक्षांत घेऊन तातडीचाची १ सभा झाली असून सर्व ठराव सर्वानुमते मंजुर झाले आहेत. त्याशिवाय दैनंदीन कामकाज आणि विचार विनिमय करण्यासाठी सायंकाळी ७ ते ९ वाजेपर्यंतच्या दरम्यान पदाधिकारी आणि संचालक कार्यालयात हजर असतात.

आभार :- सस्थेस अनेक मान्यवरांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे त्यांच्या या सहकार्याबद्दल ऋणनिर्देश व्यक्त करणे हे माझे आद्यकर्तव्य आहे. ठाणे जिल्ह्याचे नेते आणि सिडकोचे अध्यक्ष मा. श्री. नकुल पाटील, अंबरनाथचे माजी नगराध्यक्ष मा. दादासाहेब नलावडे, मा. श्री साळवी साहेब (सहाय्यक निबंधक, उल्हासनगर.) त्यांचे अधिकारी व कर्मचारी वर्ग, ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे शाखाधिकारी श्री. अस्वले साहेब, त्यांचे अधिकारी व कर्मचारी वर्ग, शासकीय लेखा परिक्षक, उपलेखा परिक्षक, अधिकारी, व त्यांचे कर्मचारी वर्ग, श्रीयुत एस्. एस्. भगत जनरल मॅनेजर, मेकॉन इंजिनिअरिंग कं., श्री बाळासाहेब सोनजे मुख्याध्यापक म. गांधी हायस्कूल अबरनाथ, वसंतराव मोहिरे, लेखाधिकारी म. रा. वि. मं. मुंबई, आणि अनावधानाने राहिलेले यांनी केलेले अमोल मार्गदर्शन व सहकार्याबद्दल मी त्यांचे हार्दिक आभार मानतो. त्याच प्रमाणे संस्थेचे अंतरगत हिशोब तपासणीस श्री. कृष्णाजी रामचद्र यशवंतराव व श्री शंकरराव केशवराव दरेकर यांनी केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल धन्यवाद.

श्रद्धांजली :- संस्थेचे संचालक श्री सुभाष शामराव भावसार यांच्या मातोश्री कै. चंदनबाई शामराव भावसार मृत्यु दि. १४-६-९२ व संस्थेचे सभासद श्री विशे यांचे वडील कै. श्री. बाबू चांगो विशे मृत्यु दि ८-९-९२ यांस संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

समारोह :- आपण सर्वांनी अत्यंत कष्टाने लावलेल्या या सहकारी रोपट्यास चिकाटीने खतपाणी घालुया, त्यांच्यावर निर्मळ प्रेम करुया आणि रोपट्याचे विशाल वटवृक्षात रुपांतर करुया सहकारी पतपेढीचे सहकारी बँकेत रुपांतर करतेहोईल. अशी जिद्ध उराशी बाळगून नव्याने कामाला लागू हीच मनिषा. सहकारी क्षेत्रांमध्ये संस्थेचा उत्कर्ष हातिच्या कर्जवसुलीवर अवलंबून असता. आपली कर्जवसुली १००% असते व ती कायम राखण्यासाठो आपण सर्वंचजण सहकार्य करीत असता या बहुमोल सहकार्याचा येथे आवर्जून उल्लेख करणे आम्हा संचालक मडळाचे आद्य कर्तव्य समजतो.

माननीय सभासद बंधूभगिनींनो, आपण आम्हा संचालक मंडळावर जो अमोल विश्वास दर्शविला आहे त्यास कोणत्याही प्रकारचे गालबोट न लावतां आपला नितांत आदर बाळगून संस्थेचा कारभार जबाबदारीने निस्पृहतेने करूं अशी ग्वाही देऊन संस्थेची आर्थिक स्थिती दर्शविनारा सन १९९१–९२ चा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रके संचालक मंडळाच्या वतीने मी आपल्यासमोर मंजुरीसाठी बिनम्रतेनें सादर करीत आहे. तरीं त्यास आपणा सर्वांनी मंजुरी द्यावी ही विनंती.

धन्यवाद

जयहिन्द - जयसहकार

श्री. जयवंत बंडू काटकर

अध्यक्ष

संचालक मंडळाचे वतीने

– संचालक मंडळाच्या सभा –

अहवालासाली संचालक मंडळाच्या एकूण १२ सभा झाल्या.

अ. नं.	सचालकांचे नांवे	उपस्थिती
१)	श्री. जयवंतराव बंडू काटकर	९
२)	श्री. अनंतराव नारायण आंबरे	१२
३)	श्री. हणमंत सदाशिव घनवट	१२
४)	श्री. भिमराव यशवंत सुर्यवंशी	१२
५)	श्री. सुभाष शामराव भावसार	७
६)	श्री. अविनाश नारायण खानविलकर	१२
७)	श्री अशोक तुकाराम चौधरी	६
८)	श्री. भालचंद्र यशवंत माने	१२
९)	श्री. प्रकाश शंकर पाटील	१२
१०)	सौ. नलिनी कृष्णाजी यशवंतराव	१२
११)	श्री. संजय जगन्नाथ दरेकर	१२
१२)	श्री. भगवान अर्जून उतेकर	१२
१३)	श्री. हरिश्चंद्र यशवंत येरुणकर	१२

वार्षिक अहवालाचे परिशिष्ट सन १९९१–९२

संस्थेचे कार्यक्षेत्र :– अंबरनाथ शहर मर्यादित

संस्थेच्या शाखा :– कोठेहि नाहीत

सभासद :– फक्त रितसर व्यक्तिगत सभासदांची नोंदणी केली आहे.

भागभांडवल :– संस्थचे भागभांडवल फक्त वैयक्तिक सभासदांनी उभारले आहे.

कर्ज :– कर्ज देणाऱ्या कोणत्याही संस्थेकडून कर्ज घेतले नाही.

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ जि. ठाणे

नोंदणी क्रमांक :- टीएनए. / युएलआर / आरएसआर / (सी आर) / ३७४ / ८९-९० दि २८-८-८९

तेरीज पत्रक दिनांक १-७-९१ ते ३०-६-९२ अखेर

जमा	रुपये पेसे	नांवे	रुपये पेसे
आरंभीची शिल्लक रोख	१,१०१-३५	शेअर्स परत	२२३०-००
-,,- बँक	४६६३-१५	सभासद दीर्घमुदत कर्ज	११६९०००-००
सभासद शेअर्स	१८३७७०-००	व्याज परत	१८०-००
सभासद दीर्घ मुदत कर्ज	८३२४४०-०८	छपाई व लेखनसामुग्री	४३०६-२५
सभासद कर्जावरील व्याज	१६६७१५-०८	किरकोळ खर्च	३७८-००
छपाई व लेखनसामुग्री	४२०४-००	दैनिक ठेव	३९००३-००
दैनंदिन ठेव खाते	४११५३-००	प्रवास खर्च	५९-००
प्रवास जमा	१०-००	ऑडिट फी	१८२०-००
प्रवेश फी	१७-००	मुदत ठेव	१३२०००-००
मुदत ठेव	१६५०००-००	शिक्षण निधी	१०००-००
अनामत	५०४-००	मदतनीस व सचिव मानधन	२६२५-००
जाहिरात	१००-००	अनामत	५०४-००
बँक लाभांश	५-००	अंतर्गत हिशोब तपासनीस फी	१२०२-००
बँक व्याज	९-००	जाहिरात खर्च	६७५-००
		वार्षिक साधारण सभा	१३०७-००
		संचालक सभा खर्च	११३०-००
		संचालक सभा भत्ता	८७०-००
		ठेवीवरील व्याज	२४९५०-००
		ऑफीस भाडे	१२००-००
		अखेर शिल्लक रोख	११३८-१०
		-,,- बँक	१४१९४-१५
एकूण रुपये	१३९९७७१-५०	एकूण रुपये	१३९९७७१-५०

श्री. भीमराव य. सुर्यवंशी
बी कॉम्
खजिनदार

श्री. हणमंत स. धनवट
चिटणीस

श्री. अनंत ना. आंबरे
बी. ए.
उपाध्यक्ष

श्री. जयवंत बं. फाटकर
अध्यक्ष

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ जि. ठाणे.

नोंदणी क्रमांक :- टीएनए. / युएलआर / आरएसआर / (सी आर) / ३७४ / ८९-९० दि. २८-८-८९

नफा तोटा पत्रक : दि १-७-९१ ते ३०-६-९२ अखेर

खर्च	रक्कम	उत्पन्न	रक्कम
	रु. पै.		रु. पै.
छपाई व लेखन सामुग्री	१०२-२५	कर्जावरील व्याज	१६६५३५-००
किरकोळ खर्च	३७८-००	बँक लाभांश	५-००
प्रवास खर्च	४९-००	बँक व्याज	९-००
ऑडिट फी	६२०-००		
मदतनीस व सचिव मानधन	२६२५-००		
अतर्गत हिशोब तपासनीस फी	७०२-००		
जाहीरात खर्च	५७५-००		
वार्षिक साधारण सभा खर्च	१३०७-००		
संचालक मंडळ सभा खर्च	११३०-००		
संचालक मंडळ सभा भत्ता	८७०-००		
ऑफीस भाडे	१२००-००		
फर्नीचर झीज	५५२-००		
देणे ऑडीट फी	२०५१-००		
देणे शिक्षण निधी	१०५०-००		
देणे सचालक सभा भत्ता	५२०-००		
देणे ठेवीवरील व्याज	६०,०००-००		
देणे कर्मचारी पगार	२१६००-००		
बुडीत कर्ज निधी तरतुद	१०,०००-००		
निव्वळ नफा	६१,२१७ ७५		
एकूण रुपये	१६६,५४९-००	एकूण रुपये	१६६५४९-००

श्री. जयवंत बंडू काटकर
अध्यक्ष

श्री. अनंत नारायण आंबरे B. A.
उपाध्यक्ष

श्री. भीमराव यशवंत सूर्यवंशी B. Com.
खजिनदार

श्री. हणमंत सदाशिव घनवट
चिटणीस

श्री महालक्ष्मी नागरी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ (पूर्व) जि. ठाणे.

नोंदणी क्रमांक टीएनए / युए स्आर / आरएसआर / (सीआर) / ३७४/ ८९.९० दिनांक २८-८-८९

- नफा विभागणी-

दिनांक ३०-६-९२ अखेर

	रु. पै.	रु. पै.	रु. पै.
दिनांक ३०-६-९२ अखेरचा नफा	६१२१७-७५	७०८०४-२५	
अधिक मागिल शिल्लक नफा	९५८६-५०		
वजा २५% राखीव निधी	१५३०५-००		
वजा २०% इमारत निधी	१२२४५-००		
वजा २% ला स. निधी	१२२५-००		
वजा २% धर्मदाय निधी	१२२५-००		
वजा सभासद कल्याण निधी	२०००-००		
वजा रौप्यमहोत्सव निधी	३०००-००		
वजा बुडीत व संशयीत कर्ज निधी	२०००-००		
वजा ८% लाभांशासाठी	३३४७७-६०	७०४७७-६०	
शिल्लक नफा			३२६-६५

श्री. भिमराव य. सुर्यवंशी	श्री. हणमंत स धनवट	श्री. अनंत ना. आंबरे	श्री. जयवंत बं. काटक
बी.कॉम्		बी. ए.	
खजिनदार	चिटणीस	उपाध्यक्ष	अध्यक्ष

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित अंबरनाथ

सभासदांना सुचना

१) आपल्या पत्त्यात बदल झाल्यास तसा बदल संस्थेस कळवावा, म्हणजे पत्रव्यवहारास सुलभ होईल.
२) सभासदास वारस नेमता येतो ज्यांनी वारसाची नोंद केली नसेल त्यांनी रितसर अर्ज करुन वारस नेमावेत व भविष्यातील अडचणी टाळाव्यात.
३) आपली पत आणि पतसंस्थेचा दर्जा वाढविण्यासाठी कर्जाचे हप्ते आणि भाग वर्गणी नियमित भरुन संस्थेस सहकार्य करा व त्याचा फायदा लाभांश रुपानें मिळवा.
४) पतपेढीचे काम सहकारी कायदा अधिनियम-नियम-यांना अनुसरुन करावे लागते. तेव्हा आपल्या व्यवहारा संबंधीकांही अडचण असल्यास ती समजून घेऊन व्यवस्थापक मंडळास सहकार्य करा.
५) कर्ज घेण्यासाठी एकमेकांच्या विश्वासाने तिघांचेगट निर्माण करा. व वरचेवर त्यात बदल करु नका.
६) पतपेढी कडून कर्ज मिळविणे उद्देश न ठेवता आपल्या मिळकतीतून बचत करा व ठेव ठेवा
७) सभासद झाल्या पासून सहा महिन्यानंतर सभासद कर्ज मागणीस व जामिन राहाण्यास पात्र ठरेल.
८) कर्ज मंजूरी करिता दोन जामिनदारांची आवश्यकता राहील.
९) सभासद हा फक्त दोन कर्ज दारांनाजामिन राहू शकेल.
१०) कर्जाची परतफेड कमाल ३६ हप्त्यात करावी लागेल
११) कर्ज घेते वेळी कर्जदार दोन्ही जामिनदारासह प्रत्यक्ष हजर रहाणे आवश्यक आहे.
१२) कर्जाचे हप्ते व वर्गणी भरते वेळी आपले पासबुक सोबत आणावे व भरुन घ्यावे.

– संस्थेची उद्दिष्टे –

१) सभासदामध्ये प्रामाणिकपणा, काटकसर, स्वावलंबन व सहकाराची भावना रुजवणे.
२) सभासदांना त्यांच्या संकटकाळी, आपत्तीच्या काळात मदत करणे.
३) आपल्या सहकार्यातून अन्यांचे जीवनमान उंचावणेस हातभार लावणे
४) सभासदामध्ये अल्पबचतीची संवय निर्माण करुन भविष्यातील अडचणीवर मात करण्यास मदत करणे.
५) वाजवी शर्तीवर कर्ज मिळवून देण्यास मदत करणे.
६) वरील उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी इतर कामे हाती घेणे.

– आवाहन –

प्रिय सभासद बंधुभागिनिना विनम्र आवाहन ! मी पतपेढीचा अध्यक्ष या नात्याने आपणा सर्वांना आवाहन करु इच्छितो की, आपली ही विशाल उद्दिष्टें साध्य करावयाची असतील तर मोठ्या भांडवलाची आवश्यकता आहे. आपल्या गरजा भागविणे सोयीचे व्हावे म्हणून आपण स्वत:, आपले मित्र व स्नेही यांचेकडून ठेवीद्वारे जास्तीत जास्त भांडवल उभारण्यासाठी आपल्या अनेक हातांच्या सहकार्याची अपेक्षा बाळगतो. ठेवीवर आकर्षक व्याज दिले जाईल. तरी माझ्या सभासद बंधु आणि भगिनिंनो आपण योग्य प्रतिसाद द्याल ही अपेक्षा.

– जय हिन्द –

" विना सहकार नही उध्दार "

श्री जयवंतराव बंडू काटकर

अध्यक्ष

पोट नियम दुरुस्ती

पोट नियम क्र.	सद्याचे पोटनियम	पोटनियम दुरुस्ती	दुरुस्तीचे कारण
क. १.२	**भाग - भांडवल** संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रुपये ५,००,०००/- असेल. सदर अधिकृत भाग-भांडवल निबंधकांच्या वेळोवेळी घेतलेल्या विशिष्ट परवानगीने वाढविण्यास मुभा राहील. प्रत्येक भागाची किंमत एका रकमेनें भरली पाहिजे.	संस्थचे अधिकृत भाग भांडवल रुपय १०,००,०००/– असेल. सदर अधिकृत भाग-भांडवल निबंधकाच्या वेळोवेळी घेतलेल्या विशिष्ठ परवानगीने वाढविण्यास मुभा राहील. प्रत्यक भागाची किंमत १०/– राहील. ती किंमत एका रकमेने भरली पाहिजे.	दिवसेनदिवस संस्थेची सदस्य सख्या वाढत असल्यामुळे व संस्थेचे वसुल भाग भांडवलाची ऑर्डर पूर्ण असल्याने
३० (क)	समितीच्या सर्व सदस्यांची सेवा साधारणत: विनामुल्य (**Gratuitous**) राहील.	व्यवस्थापक समितीमधील फक्त सचिवास वार्षिक मानधन देता येईल, परंतु मानधन ठरविण्याचा अधिकार वार्षिक सर्व साधारण अगर विशेष साधारण सभेस राहील.	संस्थेच्या वाढत्या कारभारामुळे
फ १.१	सदस्यांना १०% ते १८%च्या वार्षिक व्याजाच्या दरानें व्यवस्थापक समितीने मान्य केलेल्या एक अगर दोन सदस्यांच्या वैयक्तिक जामिनावर आणि [कोणताच बोजा नसलेला] ऋणको सदस्यांच्या स्थावर मिळकतीवर कर्ज देता येईल. या पोटनियमांच्या तरतुदीन्वये कोणीही सदस्य १०,०००/– रुपयापेक्षा अधिक रकमेस संस्थेचा कर्जदार नसला पाहिजे. (संस्थेच्या एकूण भांडवलाच्या १/८ पेक्षा अधिक रक्कम एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता आणि (एकूण भांडवलाच्या) १/१६ पेक्षा अधिक रक्कमेस२ वर्षा पेक्षा अधिक मुदतीकरीता कर्जाऊ देता येणार नाही.) जर कर्जाच्या रक्कमा रोख दिल्या तर त्या रक्कमा व्यवस्थापक समितीच्या एका तरी सदस्याच्या उपास्थितीत दिल्या गेल्या पाहिजेत.	सदस्यांना १०% ते २१% च्या वार्षिक व्याजाच्या दराने व्यवस्थापक समितीने निश्चित केलेल्या व्याज दरानुसार व्यवस्थापक समितीने मान्य केलेल्या एक अगर दोन सदस्यांच्या वैयक्तिक जामिनावर आणि (कोणताच बोजा नसलेला) ऋणको सदस्यांच्या स्थावर मिळकतीवर कर्ज देता येईल. या पोटनियमाच्या कोणत्याही एका अगर अधिक नियमांच्या तरतुदीन्वयें कोणीहि सदस्य १०,०००/– रुपयपेक्षां अधिक रकमेस संस्थेचा कर्जदार नसला पाहिजे. (संस्थेच्या एकूण भांडवलाच्या १/८ पेक्षा अधिक रक्कम, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरिता कर्जाऊ देता येणार नाही.) जर कर्जाच्या रक्कमा रोख दिल्या तर त्या रक्कमा व्यवस्थापक समितीच्या एका तरी सदस्याच्या उपस्थितीत दिल्या गेल्या पाहीजेत.	रिझर्व बँकेने व्याजाचे दर वाढविल्यामुळे.
फ १.२	१) स्थावर मिळकतीच्या गहाणवटीवर रुपये २५०००/- पर्यंत कर्ज देता येईल. परंतु अशा स्थावर मिळकतीची	१) स्थावर मिळकतीच्या गहाणवटीवर, वहान खरेदीसाठी वहानाच्या तारणावर व इतर गृहोपयोगी वस्तु खरेदी करण्या-	वहान खरेदी साठी व इतर गृहोपयोगी

पोट नियम दुरुस्ती

पोट नियम क्र.	सद्याचे पोटनियम	पोटनियम दुरुस्ती	दुरुस्तीचे कारण
फ. १.२	किंमत कर्ज दिलेल्या रक्कमेच्या दुप्पटीपेक्षा कमी असता कामा नये. अशा स्थावर मिळकतीच्या सर्व प्रकारच्या धोक्यासाठी विमा उतरविला पाहिजे आणि त्यावरच व्यवस्थापक समितीच्या संमतीने ऋणको सदस्याचा वैयक्तिक जामिन (Security) घेतला पाहिजे. २) रुपये १०,०००/- रुपये पर्यंतच्या कर्जाऊ रक्कमा व्यवस्थापक समितीने संमत केलेल्या दोन सदस्यांच्या वैयक्तिक जामिनावर देता येतील. ३) तातडीचे कर्ज रु. १०००/- पर्यंत १० महिनेपेक्षा कमी मुदतीसाठी देता येईल.	साठी रुपये २५००० पर्यंत कर्ज देता येईल. परंतु अशा स्थावर मिळकतीची किंमत कर्ज दिलेल्या रक्कमेच्या दुप्पटीपेक्षा कमी असता कामा नये. अशा स्थावर मिळकतीच्या सर्व प्रकारच्या धोक्यासाठी विमा उतरविला पाहिजे. आणि त्यावरच व्यवस्थापक समितीच्या संमतिनें ऋणको सदस्याचा वैयक्तिक जामीन (security) घेतला पाहिजे. २) रुपये १०,०००/- पर्यंतच्या कर्जाऊ रक्कमा व्यवस्थापक समितीने संमत केलेल्या दोन सदस्याच्या वैयक्तिक जामिनावर देता येईल. ३) तातडीचे कर्ज रु. १०००/- पर्यंत १० महिनेपेक्षा कमी मुदतीसाठी देता येईल.	वस्तु खरेदी साठी कर्ज देता यावे म्हणून.
फ २.१	पोटनियम क्रमांक फ. १.१ मध्ये उल्लेख केलेला व्याजाचा दर वार्षिक सभेने प्रत्येक वर्षी निश्चित केला पाहिजे. वार्षिक सभेला या व्याजाच्या दरात फेरबदल करता येईल. परंतु तो १० टक्यापेक्षा कमी व १८ टक्यापेक्षा अधिक असू नये. परंतु तो बँक विनिमय दरापेक्षा जास्त असावा	पोटनियम क्रमांक फ. १.१ मध्ये उल्लेख केलेला व्याजाचा दर वार्षिक सभेनें प्रत्येक वर्षी निश्चित केला पाहिजे. वार्षिक सभेला या व्याजाच्या दरात फेरबदल करता येईल. परंतु तो १० टक्यापेक्षा कमी व २१ टक्यापेक्षा अधिक असू नये. परंतु तो बँक विनिमय दरापेक्षा जास्त असावा.	रिझर्व बँकेने व्याजाचे दर वाढविल्यामुळे
ह १.७	साधारण सभेच्या इतिवृत्ताची नोंद, नोंदवहित (Minute Book) केली पाहिजे आणि सभेच्या अध्यक्षांनी त्यावर सही केली पहिजे व ती. इतिवृत्ते मंजूर केली पाहिजे व पुढील सभेपुढे माहितीसाठी ठेवली पाहिजे सहकारी (३० जून) वर्ष संपण्याच्या तारखेच्या दिवसापसून साडेचार (१४ नोव्हेंबर पूर्वी) महिन्याच्या आंत वार्षिक साधारण सभा बोलवीली पहिजे किंवा निबंधकाच्या पूर्व परवानगीने मुदतवाढ घेऊन १४ फेब्रुवारीच्या आत घेतली पाहिजे.	साधारण सभेच्या इतिवृत्ताची नोंद नोंदवहित(Minute Book) केली पाहिजे आणि सभेच्या अध्यक्षांनी त्यावर सही केली पाहिजे, व ती इतिवृत्ते मंजूर केली पाहिजेत व पुढील सभेपुढे माहीतीसाठी ठेवली पाहिजेत. सहकारी(३१ मार्च)वर्ष संपण्याच्या तारखेच्या दिवसापासून साडेचार (१४ ऑगष्ट पूर्वी)महिन्याच्या आंत वार्षिक साधारण सभा बोलविली पाहिजे किंवा निबंधकाच्या पूर्व परवानगीने मुदतवाढ घऊन १४ नोव्हेंबरच्या आत घेतली पाहिजे वार्षिक सभा बोलविण्याची जबाबदारी संस्थेचे अध्यक्ष	सहकारी कायदयातील तरतुदीस अनुसरुन

पोट नियम दुरुस्ती

पोट नियम क्र.	सद्याचे पोट नियम	पोट नियम दुरुस्ती	दुरुस्तीची कारणे
ह. १.७	वार्षिक सभा बोलविण्याची जबाबदारी संस्थेचे अध्यक्ष/उपाध्यक्ष/सेक्रेटरी, व्यवस्थापक समिति (सामुदायीकपणे) ह्यांची क्रमशः राहील.	/उपाध्यक्ष/सेक्रेटरी, व्यवस्थापक समिती (समुदायीकपणे) ह्यांची क्रमशः राहील	
ह. १८	वार्षिक साधारण सभेत अगर विशेष साधारण सभेत निवडून आलेल्या १३ सदस्यांची व्यवस्थापक समिती बनेल. पैकी १ सदस्य अनुसूचित जाती/जमाती व १ सदस्य की, जो आर्थिक दृष्टया मागासलेल्या गटातील सदस्यांमधून असावा. अशी व्यवस्थापक समिती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस, खनिजदार, व समिती सदस्य निवडून आलेल्या सदस्यांतून निवडेल. व्यवस्थापक समितीची गणसंख्या (Quorum) सात राहील.	वार्षिक साधारण सभेत अगर विशेष साधारण सभेत निवडून आलेल्या १३ सदस्यांची व्यवस्थापक समिती बनेल. पैकी १ सदस्य अनुसुचित जाती / जमाती व १ सदस्य की, जो आर्थीक दृष्टया मागासलेल्या गटातील सदस्यामधून असावा. अशी व्यवस्थापक समिती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस, खजिनदार व समिती सदस्य, निवडून आलेल्या सदस्यातून निवडेल. व्यवस्थापक समितीची गणसंख्या (Quorum) सात राहील.	महाराष्ट्र शासन आदेश क्र. सी. सो. आर १८९१/सी. आर.–११२ /७स. दि. १२-७-९१ अन्वये कालावधीत बदला झाल्यामुळे
	संचालक मंडळाची मुदत ३ वर्षे (सहकारी वर्षे) राहील संचालक मंडळाची निवडणूक गुप्त मतदान पद्धतीनें घेतली पाहिजे. संचालक मंडळाची निवडणुकीस पुरेसे अर्ज न आल्यास साधारण सभेत निवड करावी. निवड न झाल्यास तसे उपनिबंधकांना विद्यमान चेअरमन, सेक्रेटरी यांनी कळविले पाहिजे. व त्याच्या सुचनेनुसार व्यवस्था केली पाहिजे.	संचालक मंडळाची मुदत५वर्षे (सहकारी वर्षे) राहील. संचालक मंडळाची निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने घेतली पाहिजे. संचालक मंडळाच्या निवडणूकीस पुरेसे अर्ज न आल्यास साधारण सभेत निवड करावी. निवड न झाल्यास तसे उपनिबंधकांना विद्यमान चेअरमन, सेक्रेटरी यांनी कळविले पाहिजे. व त्यांच्या सुचनेनुसार व्यवस्था केली पाहिजे.	
	कलम-७३ अ-प्रमाणे सलग १० वर्षापेक्षा अधिक काळ पदाधिकारी म्हणून राहता येणार नाही पुन्हा पदाधिकारी होण्यापूर्वी ५ वर्षाचा कालावधी असावा. ही अट निर्दिष्ट सहकारी संस्थांसाठी लागू होईल.	कलम ७३-अ-प्रमाणें सलग १० वर्षापेक्षा अधिक काळ पदाधिकारी म्हणून राहता येणार नाही; व पुन्हा पदाधिकारी होण्यापूर्वी ५ वर्षाचा कालावधी असावा. ही अट निर्दिष्ट सहकारी संस्थांसाठी लागू होईल	दिवसेन दिवस वाढत असलेल्या महागाईमुळे
	पोटनियम व साधारण सभेत मंजूर केलेल्या ठरावाच्या [तरतुदिंच्या] उपबंधास आधीन राहून, संस्थेचे कामकाज चालविण्याचा पूर्ण अधिकार व्यवस्थापक समितीस राहील. संस्थेच्या कामकाजासाठी व्यवस्थापक समितीची सभा महिन्यातून एकदा भरविली पाहिजे संचालक मंडळाच्या सभेस उपस्थित असलेल्या संचालकांना फक्त महिन्यातून एक वेळा मिटिंग भत्ता रु. १०/- घेता येईल.	पोटनियम व साधारण सभेने मंजूर केलेल्या ठरावाच्या [तरतुदिंच्या] उपबंधास अधिन राहून, संस्थेचे कामकाज चालविण्याचा पूर्ण अधिकार व्यवस्थापक समितीस राहील. संस्थेच्या कामकाजासाठी व्यवस्थापक समितीची सभा महिन्यातून एकदा भरविली पाहिजे. संचालक मंडळाच्या सभेस उपस्थित असलेल्या संचालकांना फक्त महिन्यातून एक वेळ मिटिंग भत्ता रुपये २०/- घेता येईल.	वाढत्या महागाईमुळे

श्री महालक्ष्मी नागरी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ (पूर्व) जि. ठाणे.

अंतर्गत हिशोब तपासनीसांचा अहवाल

आम्ही श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित अंबरनाथ या संस्थेचा सोबत जोडलेल्या सन १९९१–९२ चा तेरीज, नफा-तोटा पत्रक व ताळेबंदाचे लेखापरीक्षण केले असून अहवाल करतो की,

१) आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणें जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध करुन दिले आहे.

२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोपत्तीस येईल त्यावरुन संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा व त्या खालील नियम व संस्थेच्या पोटनियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणें योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

३) आम्ही तपासलेले तेरीज नफा–तोटा पत्रक व ताळेबंद संस्थेच्या हिशोबाची पुस्तकाशी व बिवरणाशी जुळत आहे.

४) आमच्या मतें आमच्या संपूर्ण माहितीप्रमाणें तसेच आम्हाला देण्यात आलेल्या खुलाशावरुन हे हिशेब महाराष्ट्र सहकारी संस्थाचा १९६० व त्या खालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी माहिती देतात.

अंबरनाथ

दिनांक १ ऑगस्ट १९९२

अंतर्गत हिशोब तपासनीस

श्री. शंकरराव केशवराव दरेकर

श्री. कृष्णाजी रा. यशवंतराव
B. Com.